# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)

II, मुथ्था चेंबर्स (विस्तार इमारत), सेनापती बापट मार्ग, पुणे-४११०१६

**उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.२**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचे कार्यालय
बी.एस.एन.एल. बिल्डींग, १ ला मजला, शिवाजीनगर पोस्ट
ऑफिस शेजारी, शिवाजीनगर, पुणे - ४११००५
झोपुप्रा/सप्रा-२/प्र.क्र.१७१/३९१ वडारवाडी/१८७/२०१९
दिनांक :- ०७/०३/२०१९

## जाहीर प्रकटन

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **'उपरोक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे) कलम ३ नुसार महाराष्ट्र शासन अधिसूचना झोपुयो २००४/प्र.क्र.२१३/झोपुसु १, दि.३०/६/२००५ अन्वये करणेत आलेली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३ (वाय) मधील तरतुदीनुसार झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन झोपडपट्टीधारकांची पात्रता निश्चित करुन त्याबाबतची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट-२) तयार करणेचे अधिकार उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झो.पु.प्रा., पुणे यांना प्रदान केलेले आहेत.

खालील परिशिष्ट 'अ' मध्ये नमुद केलेल्या मिळकतीच्या ठिकाणी राहणा-या सर्व झोपडपट्टीवासीयांना या जाहीर प्रकटनाद्वारेकळविणेत येते की, प्रस्तुत मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविवणेबाबतचा प्रस्ताव मे.सुयश व्हेंचर्स, १२०७/बी, अस्मिता हौ.को.ऑ.सो. आपटे रोड, पुणे-४११ ००४ या विकसकाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे कार्यालयाकडे दाखल केलेला आहे. मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा., पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक जा. क्र. झोपुप्रा/तां.१/प्र.क्र.१७१/१८६०/१४ दि.२९/१०/२०१४ अन्वये झोपडीधारकांची पात्रता तपासणी व संमतीपत्रे पडताळणी करुन झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट-२) निश्चित करणेबाबत कळविले आहे.

परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद मिळकतीवरील झोपडपट्टीत राहणा-या झोपडीधारकांचे या विभागामार्फत सर्व्हेक्षण करणेत आलेले असून पात्र व अपात्र झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट-२) या कार्यालयाने तयार केलेली आहे. सदर झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट-२) परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केलेल्या मिळकतीवरील झोपडपट्टीमध्ये ठळक दर्शनी ठिकाणी तसेच सार्वजनिक ठिकाणी व या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर दि.०८/०३/२०१९ रोजी प्रसिद्ध करणेत येत आहे. विषयांकीत मिळकतीवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील प्राथमिक यादीत अपात्र ठरलेल्या झोपडीधारकांनी हरकत अर्ज दाखल केलेले नाहीत. तरी परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद मिळकतीवरील झोपडपट्टीत राहणा-या सर्व झोपडीधारकांनी प्रसिध्द होणारी अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट-२) पाहून आपले पात्रतेची खात्री करावी. तसेच पात्रता यादी या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहणेसाठीसुध्दा उपलब्ध आहेत.

तरी प्रस्तुत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अंतिम पात्रता यादीत (परिशिष्ट-२) जे झोपडीधारक अपात्र म्हणून निश्चित झालेले आहेत त्यांना आपले अपात्रतेचे अनुषंगाने अपील दाखल करणेचे असलेस अथवा अंतिम पात्रता यादीतील जे झोपडीधारक पात्र /अपात्र झाले आहेत त्या पात्र / अपात्र झोपडीधारकांबाबत अन्य व्यक्ती, इसम यांना आक्षेप नोंदविणेचे असेल तर त्यांनी आपले आक्षेप व हरकती दि. ०८ /०३/२०१९ या प्रसिद्धीच्या दिनांकापासून ३० दिवसाचे आत मा. सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचे कार्यालय, सेनापती बापट रोड, मुथ्था चेंबर्स-२, पुणे -१६ येथे कार्यालयीन वेळेत केवळ अपील अर्जाचे माध्यमातून लेखी स्वरुपात पुराव्यानिशी दाखल कराव्यात.

**परिशिष्ट 'अ'**

| मिळकतीचे ठिकाण | दाखल प्रस्तावा नुसार योज-ेचे एकूण क्षेत्र (चौ.मी) | एकूण झोपड्यांची संख्या | पात्र झोपडी-धारकांची संख्या | अपात्र झोपडीधारकांची संख्या | चतु:सिमा | विकसकाचे नाव व संपूर्ण पत्ता. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| सि.स.नं.९६३ (अ),फा.प्लॉ.नं. ३९१(अ), भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे. | २६८३.०५ चौ.मी. | एकूण झोपड्यांची संख्या = १६०<br>झोपडीधारकांच्या संमतीपत्रांची एकूण संख्या = १०४ | एकूण पात्र = ५७ पैकी निवासी पात्र = ५७ | एकूण अपात्र = १०३ पैकी निवासी अपात्र = १०३ | पूर्व - लागू न.भू.क्र. ३८८, ३८२, ३८३<br>पश्चिम - लागू न.भू.क्र. ३९२.<br>दक्षिण - लागू रस्ता<br>उत्तर - लागू रस्ता | मे.सुयश व्हेंचर्स,१२०७/ बी, अस्मिता हौ.को.ऑ. सो.आपटे रोड, पुणे-४११ ००४ |

उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.२
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

स्थळ :- पुणे.
दिनांक :- ०७/०३/२०१९

**प्रत :-**

१) श्री. भुषण राऊत, प्रोजेक्ट संगणक अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे २/- उपरोक्त जाहिर प्रकटन झोपुप्राच्या वेबसाईट वर अपलोड करणेत यावी.

२) मे.सुयश व्हेंचर्स,१२०७/बी, अस्मिता हौ.को.ऑ. सो.आपटे रोड, पुणे-४११ ००४ :- जाहीर प्रकटनाची प्रत समाविष्ट करणेत आली असून उपरोक्त जाहीर प्रकटनाची प्रसिद्धी विषयांकीत मिळकतीवरील झोपडपट्टीमधील झोपडीधारकांमध्ये करणेत यावी.

## दि. ०१/०१/२००० या अर्हता दिनांकाप्रमाणे अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट - २) चा गोषवारा

अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट - २) दिनांक ०१/०१/२००० प्रमाणे

झोपडपट्टीच्या मिळकतीचे वर्णन : सि.स.नं.९६३(अ), फा.प्लॉ.नं.३९१(अ), भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे येथील झोपडीधारकांची यादी

संदर्भ : १) मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा., पुणे यांचे कडील जा.क्र.झोपुप्रा/तां १/प्र.क्र.१७१/१८६०/१४ दि.२९/१०/२०१४ रोजीचे पत्र.

२) महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडील शासन निर्णय क्र.टीपीएस-१८१२/७८६/प्र.क्र.२६२/१२, पुर्नबांधणी क्र.९०/नवि-१३, दि.११/०९/२०१४.

३) महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडील शासन निर्णय क्र.झोपुधो-१००१/प्र.क्र.१२५/१४/झोपसु-१, दि.१६/०५/२०१५.

| | | |
|---|---|---|
| १ | एकूण झोपडयांची संख्या | १६० |
| २ | एकूण पात्र झोपडयांची संख्या | ५७ |
| ३ | एकूण अपात्र झोपडयांची संख्या | १०३ |
| ४ | एकूण निवासी झोपडयांची संख्या | १६० |
| | एकूण पात्र निवासी झोपडयांची संख्या | ५७ |
| | एकूण अपात्र निवासी झोपडयांची संख्या | १०३ |
| ५ | झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस विकसक यांना संमती दिलेल्या पात्र झोपडीधारकांची संख्या | ५४ |
| ६ | संमती दिलेल्या पात्र झोपडीधारकांची टक्केवारी | ९४.७३ % |

सर्व्हेक्षक
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

नायब तहसिलदार
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

उपजिल्हाधिकारी ~~तथा सक्षम प्राधिकारी~~ क्र.२
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.